|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||
**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव**
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon
(पूर्वीचे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव)

# निवडणूक शाखा

जा.क्र.: कबचौउमवि/२/निवडणूक/३३५ /२०२२ दिनांक : ०७/१२/२०२२

प्रति,
**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नीत सर्व महाविद्यालयांच्या व परिसंस्थांच्या व्यवस्थापनाचे मा. अध्यक्ष / सचिव**

**विषय :- व्यवस्थापन प्रतिनिधींच्या गटामधून अधिसभेवर निवडून द्यावयाच्या सदस्यांच्या गटासाठी नामनिर्देशन अर्जांच्या छाननी बाबत.**

महोदय/महोदया,

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ नुसार विद्यापीठाच्या विविध प्राधिकरणांच्या निवडणुका घेण्यासाठी अधिनियमातील तरतुदीन्वये विद्यापीठाने प्रसिध्द केलेल्या निवडणूक कार्यक्रमानुसार व्यवस्थापन प्रतिनिधींच्या गटांमधून कायदा कलम २८ (२) (त) नुसार अधिसभेसाठी निवडून द्यावयाच्या सदस्यांसाठी निवडणूक सूचना दि.०७/१२/२०२२ रोजी प्रसिध्द करण्यात आली असून त्या अनुषंगाने दिनांक १५ व १६ डिसेंबर, २०२२ रोजी विद्यापीठास व्यवस्थापन प्रतिनिधींच्या गटामधून नामनिर्देशन अर्ज प्राप्त होणार आहेत.

उपरोक्त अनुषंगाने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ चा सन २०१७ चा एकरुप परिनियम क्र.१ मधील कलम १० (६) नुसार नामनिर्देशन अर्जांची छाननी खालील ठिकाणी करावयाचे विद्यापीठाने निश्चित केले आहे :

| नामनिर्देशन अर्जाच्या छाननीचे ठिकाण | दिनांक व वेळ |
|---|---|
| कुलसचिव कार्यालय | १७ / १२/ २०२२ रोजी सकाळी १०.३० वाजता |

या संदर्भात आपणास कळविण्यात येते की, उमेदवार किंवा उमेदवाराव्दारे लिखीत स्वरुपात योग्य पध्दतीने प्राधिकृत करण्यात आलेली, आणि ज्याचे नाव अंतिम मतदार यादीत समाविष्ट आहे, असा उमेदवाराचा प्रतिनिधी हे अशा छाननीच्या वेळी उपस्थित राहण्यास हक्कदार असतील, याची कृपया नोंद घ्यावी.

कळावे,

आपला विश्वासू,

**( डॉ. विनोद पाटील)**
कुलसचिव तथा
निवडणूक निर्णय अधिकारी